ePaper

## ऐन दिवाळीत प्रवाशांच्या खिशाला कात्री, राज्यभरात ST बसचं तिकीट वाढलं!



| वर्ष - 7 | अंक - 177 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 4 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- अफगाणिस्तान पाचव्या स्थानी!
- उर्फी जावेदला अटक?
- विवाहित महिलेला वर्षाला 12 हजार!
- अमोल कोल्हे अजित पवार गटात?

# पुनावळे कचरा डेपो विरोधात सोसायटीधारक म्हणतात...

# SAY NO TO GARBAGE DEPOT

## » प्रशासनाला सनदशीर मार्गाने विरोध : मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या निर्णयाकडे स्थानिकांचे लक्ष




**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुनावळेतील सोसायटीधारक देखील कचरा डेपो विरोधातील आंदोलनात आक्रमक पवित्रा घेताना दिसत आहेत. कचरा डेपो हटवा, पुनावळे वाचवा आणि SAY NO TO GARBAGE DEPOT अशा आशयाचे फलक सोसायटीधारकांनी लावून आपला विरोध दर्शविण्यास सुरूवात केली आहे. तसेच, SAVE PUNAWALE असे आवाहन करीत सनदशीर मार्गाने हा लढा लढण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. तर कचरा डेपो हटविण्याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या निर्णयाकडे सोसायटीधारकांचे लक्ष आहे.**



पिंपरी-चिंचवड शहर वाढत असताना भविष्यातील गरज लक्षात घेऊन महापालिकेने शहरातील दुसऱ्या टोकाला पुनावळे येथील वन विभागाची जागा कचरा डेपोसाठी आरक्षित केली आहे. वन विभागाने जागा ताब्यात देण्यास प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे हा प्रकल्प रखडला आहे. मात्र त्याला गती देण्यात आली असून या ठिकाणी कचरा डेपो करण्याची कार्यवाही महापालिका स्तरावर वेगात सुरू आहे. महापालिकेने सन 2008 मध्ये पुनावळे येथे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर केला. त्यावेळी पुनावळे भागात नागरीकरण झालेले नव्हते. मात्र या 15 वर्षात मोठे नागरीकरण झाले असून पुनावळे परिसरातील लोकसंख्या एक लाख पेक्षा अधिक झाली आहे. इथले नैसर्गिक वातावरण, बाजूला असलेले आयटी पार्क आणि पुनावळे येथे आरोग्य, शिक्षण, गृह प्रकल्प या सुविधांमुळे नागरिक इथे राहण्याला पसंती देत आहेत.

इथे होऊ घातलेला घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प रहिवासी परिसरापासून काही मीटरच्या अंतरावर आहे. कचरा डेपोमुळे पुनावळे येथील नैसर्गिक संपत्ती नष्ट होईल. नागरिकांना दुषित पाणी प्यावे लागेल. हा प्रकल्प शहराच्या पश्चिम दिशेला आहे. हवेचा प्रवाह नेहमी पश्चिमेकडून पूर्वेकडे असतो. हा कचरा डेपो झाल्यास पुनावळेतील नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागेल, अशी भीती नागरिकांनी व्यक्ती केली आहे. पुनावळेसह वाकड, ताथवडे, हिंजवडी आयटी पार्क, मारुंजी या भागातही त्याचा त्रास जाणवणार आहे. महापालिका प्रशासनाच्या वतीने हा कचरा डेपो सुरु करण्याच्या कामाला गती दिली आहे. महापालिका प्रशासनाच्या या आडमुठी भूमिकेविरोधात आता पुनावळेतील सोसायटीधारक देखील लढा देण्यासाठी सज्ज झाले आहेत. पुनावळेतील सोसायटीमध्ये कचरा डेपो नको, अशा आशयाचे फलक उभारून नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. यासाठी सनदशीर मार्गाने लढा चालूच ठेवण्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला आहे.

### शास्त्रोक्त पद्धतीच्या प्रक्रियेचे गाजर...

**»पुनावळे येथे इंदूर शहराच्या धर्तीवर अत्याधुनिक कचरा डेपो उभारण्याचे महापालिकेने नियोजन केले आहे. परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होऊ नये म्हणून संपूर्ण परिसरास सीमाभिंत घातली जाणार असल्याचे महापालिका प्रशासन सांगत आहे. चारी बाजूने झाडी असणार आहे. शहराचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग घरोघरीचा कचरा संकलन करून मोशी कचरा डेपोत जमा केला जात आहे. सध्या 1 हजार 200 टन कचरा दररोज जमा होतो. पुनावळे कचरा डेपो सुरू झाल्यानंतर अर्ध्या शहराचा तसेच, समाविष्ट झालेल्या भागातील कचरा तेथे जमा करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. तेथे कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावली जाणार असल्याचे गाजर अधिकारी दाखवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.**

### अजित पवार यांच्या निर्णयाकडे लक्ष...

**»महापालिकेकडून पुनावळे येथे कचरा डेपो तयार करण्याबाबत कार्यवाही सुरू केली आहे. त्याठिकाणी होणाऱ्या कचरा डेपोस स्थानिक नागरिकांचा विरोध आहे. त्यासंदर्भात सर्व बाबी तपासून निर्णय घेऊ, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिकेतील आढावा बैठकीत स्पष्ट केले होते. प्रकल्पासंदर्भात त्यांची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. त्यांच्या निर्णयाकडे नागरिकांचे लक्ष आहे. कारण, कचरा डेपोचे आरक्षण २००८ मध्ये टाकण्यात आले त्यावेळी आघाडी सरकारच्या काळात अजित पवार हेच उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री होते. आता महायुतीच्या सत्ताकाळातही अजित पवार यांच्याकडे जिल्ह्याचा कारभार आहे.**

# पुणे विद्यापीठात गुंड कसे घुसले?

## » खासदार सुप्रिया सुळेंची चौकशीची मागणी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या संघटनांमध्ये हाणामारी झाल्याची घटना ताजी असतानाच गुरुवारी पुन्हा एकदा विद्यापीठात राजकीय राडा झाला. भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आणि स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या कार्यकर्त्यांमध्ये आधी बाचाबाची आणि नंतर हाणामारी झाली.**




### सुप्रिया सुळे यांनी घेतली दखल

» राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेची दखल घेत मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली आहे. यात त्यांनी म्हटलं आहे की, आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भाजपाप्रणित विद्यार्थी संघटनेच्या मुलांनी दुसऱ्या विद्यार्थी संघटनेच्या विद्यार्थ्यांना मारहाण केली आणि त्यानंतर विद्यापीठात आंदोलन करायला सुरुवात केली. पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. या शहरात कोणत्याही शैक्षणिक परिसरात अशा पद्धतीने राजकारणाचे खेळ करणं सत्ताधारी पक्षाला शोभत नाही. शैक्षणिक परिसराचे पावित्र्य आणि शांतता भंग करण्याचा अधिकार या लोकांना नाही.

या हाणामारीच्या प्रकारावर राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेवरून भारतीय जनता पक्षावर निशाणा साधला आहे. तसेच याप्रकरणी चौकशीची मागणीदेखील केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी विद्यापीठातील वसतिगृहाच्या भिंतीवर आक्षेपार्ह मजकूर लिहिण्यात आल्याबाबत कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केली होती. या कृतीच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर निषेध आंदोलन केलं.

या आंदोलनादरम्यान, भाजपा कार्यकर्ते आणि विद्यापीठात सदस्य नोंदणी करत असलेल्या स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडियाचे कार्यकर्ते यांच्यात बाचाबाची झाली. यावेळी जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेची दखल घेत मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली आहे. यात त्यांनी म्हटलं आहे की, आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भाजपाप्रणित विद्यार्थी संघटनेच्या मुलांनी दुसऱ्या विद्यार्थी संघटनेच्या विद्यार्थ्यांना मारहाण केली आणि त्यानंतर विद्यापीठात आंदोलन करायला सुरुवात केली. पुणे हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. या शहरात कोणत्याही शैक्षणिक परिसरात अशा पद्धतीने राजकारणाचे खेळ करणं सत्ताधारी पक्षाला शोभत नाही.

शैक्षणिक परिसराचे पावित्र्य आणि शांतता भंग करण्याचा अधिकार या लोकांना नाही. खासदार सुळे यांनी म्हटलं आहे की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात खेड्यापाड्यातून आलेल्या गरीब विद्यार्थ्यांना मारहाण करणारे गुंड विद्यापीठात कसे घुसले आणि त्यांनी कोणत्या अधिकाराने या मुलांना मारहाण केली? याची कसून चौकशी होण्याची गरज आहे. गृहमंत्र्यांचे (देवेंद्र फडणवीस) या गुंडगिरीला अभय आहे का? याचाही खुलासा यानिमित्ताने व्हायला हवा. विद्यापीठाच्या कुलगुरू महोदयांनी याबाबत तातडीने निर्णय घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी.

# निगडी ते हिंजवडी मेट्रो धावणार!

## » मेट्रो करणार सर्वंकष वाहतूक आराखडा

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे, पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी पुणे महामेट्रोने सर्वंकष वाहतूक आराखडा (कॉंप्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅन) तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. पुढील सहा महिन्यांत त्याचे काम पूर्ण होईल. त्यानंतर मेट्रोचे नवीन मार्ग करण्यात येणार असून, निगडी ते हिंजवडी अशी नवीन मेट्रो मार्गिका तयार करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.**




> “निगडीपर्यंतच्या मेट्रो कामाची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. जागेची काही अडचण नाही. स्थानकांवर येण्या-जाण्यासाठीच भूसंपादन करावे लागणार आहे. तीन महिन्यांत प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल. साडेतीन वर्षांत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.”
> – **श्रावण हर्डीकर,** व्यवस्थापकीय संचालक, पुणे महामेट्रो

वर्षाला सव्वालाख लोकसंख्येची भर पडत आहे. त्यामुळे वाहतुकीचे सर्वेक्षण आवश्यक आहे. शहरातील प्रमुख रस्त्यावरून तासाला दुचाकी, चारचाकी, बस, ट्रक, तीनचाकी अशी किती वाहने धावतात. कोणत्या दिशेने जातात. पादचाऱ्यांचे प्रमाण किती आहे. विशिष्ट वेळेत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या आधारे हे सर्वेक्षण केले जाणार आहे. ज्या मार्गावर जास्त वर्दळ राहील याचा अंदाज घेऊन नवीन मेट्रो मार्ग विकसित केला जाणार आहे. मेट्रोचे कासारवाडी स्थानक वर्दळीचे आहे. नाशिक फाटा येथून नाशिकला आणि चाकणला जाणाऱ्या लोकांची संख्या किती याचा अभ्यास केला जाणार आहे. नाशिक फाटा ते चाकण आणि वर्तुळाकार रस्त्यांवर (एचसीएमटीआर) ‘निओ मेट्रो’ विकसित करण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार असल्याचेही त्यांनी सांगितले. पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक कंपन्यांमधील अनेक कामगार पुण्यातून कंपनीच्या खासगी बसने प्रवास करतात. मेट्रोने प्रवास करावा यासाठी त्यांच्याशी चर्चा सुरू आहे. कामगारांनी वल्लभनगरपर्यंत मेट्रोने आणि तेथून खासगी बसने प्रवास करावा, असे प्रयत्न सुरू आहेत. दिल्लीत लोक पायी, सार्वजनिक वाहतुकीने मेट्रो स्थानकापर्यंत येतात. त्यामुळे तेथील मेट्रोला प्रतिसाद मिळतो.

# आदिवासी विद्यार्थ्यांना नोकरीसाठी सुवर्णसंधी

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

देशातील ग्रामीण आणि आदिवासी भागातील तंत्रशिक्षण महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) स्वतंत्र प्लेसमेंट संकेतस्थळ सुरू केले आहे.

या संकेतस्थळावर सरकारी, खासगी कंपन्यांनी नोंदणी केली असून, कंपन्यांतील नोकऱ्यांची विद्यार्थ्यांना घरबसल्या माहिती मिळू शकणार आहे. शहरातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत ग्रामीण आणि आदिवासी भागांतील विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांना संधी मिळण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ सुरू करण्याचा निर्णय एआयसीटीईने घेतल्याची माहिती एआयसीटीईचे उपाध्यक्ष डॉ. अभय जेरे यांनी जूनमध्ये पुण्यात दिली होती. या पार्श्वभूमीवर एआयसीटीईचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सीताराम यांनी या संकेतस्थळाचे अनावरण केले. हे संकेतस्थळ आता एआयसीटीईच्या इंटर्नशीप संकेतस्थळाशीही जोडण्यात येणार आहे. या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना नोंदणी करावी लागणार आहे. डॉ. सीताराम म्हणाले, की या संकेतस्थळाद्वारे ग्रामीण आणि आदिवासी भागातील अभियांत्रिकीसह अन्य तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना नोकरीसाठी भटकावे लागणार नाही. या संकेतस्थळाद्वारे विद्यार्थी थेट हजारो बहुराष्ट्रीय कंपन्यांशी जोडले जातील. विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर नोंदणी केल्यावर त्यांना त्यांच्या विषयाशी संबंधित नोकरीचे हजारो पर्याय उपलब्ध होतील. आतापर्यंत चार हजारहून अधिक कंपन्यांनी नोंदणीसाठी इच्छा प्रदर्शित केली आहे. त्यामुळे कंपन्यांना देशभरातील उत्कृष्ट अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन महाविद्यालयांतील उत्तम मनुष्यबळाचा शोध घेण्याचा सुलभ पर्याय उपलब्ध झाला आहे.

## शापित पवना : बेजबाबदार प्रशासन; मश्गुल राजकारणी अन्

# रामभरोसे पिंपरी-चिंचवडकर!

### सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात : महायुतीच्या सत्तेत नदी सुधार प्रकल्प 'बुडाला'

**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी**

**राज्यात भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी असे शहरातील प्रस्थापित नेते, पदाधिकारी यांचे सरकार असताना पवित्र पवना नदी 'शापित' आहे. पिंपरी-चिंचवडकरांना पाणीपुरवठा करणारा रावेत बंधारा याच नदीवर आहे. पण, रसायन आणि सांडपाणी-मैलामिश्रीत पाणी नदीपात्रात थेटपणे सोडले जाते. त्यावर प्रक्रिया करणारी कोणतीही यंत्रणा प्रशासनाकडे नाही. पिण्याचे पाणी दुषित होते आहे. नदी पात्रातील जलसृष्टी अक्षरशः संपलेली आहे. मात्र, स्मार्ट सिटी आणि विकसित शहराच्या बढाया मारणारे स्थानिक नेते सत्तेत मश्गुल आहेत. प्रशासन बेजबाबदार आणि पिंपरी-चिंचवडकर रामभरोसे आहे, अशी खंत सामान्य नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेली पवना नदी फेसाळली आहे. एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार यांनी नदी सुधार प्रकल्प हाती घेतले आहेत. तर दुसरीकडे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे ढिम्म प्रशासन नदी सुधार बाबत कुठलीही कार्यवाही करत नसल्याने पवनामाईची पुरती वाट लागली आहे. नदी पात्रात केमिकल युक्त पाणी मिश्रित झाल्यामुळे थेरगाव येथील केजुदेवी बंधाऱ्यातील पाणी मोठ्या प्रमाणात फेसाळलेले पाहायला मिळत आहे.

थेरगाव येथील केजुदेवी बंधारा ते चिंचवडगावातील श्री मोरया गोसावी घाट या दरम्यान पवना नदी मोठ्या प्रमाणात फेसाळल्याचे चित्र आहे. पर्यावरण प्रेमी आणि स्वयंसेवी संस्था-संघटनांनी प्रशासनाच्या कारभारावर टीकेची झोड उठवली आहे. शहरातील ड्रेनेजचे पाणी कुठलीही प्रक्रिया केल्याशिवाय थेट नदीत सोडले जाते. तसेच रसायन मिश्रित पाणी देखील नदीत मिसळले जाते. यामुळे पवना नदीची दुरवस्था झाली आहे. जलपर्णी वाढणे, पाण्यावर फेस येणे, हे प्रकार सातत्याने सुरु आहेत. नदीचे आरोग्य बिघडल्याने त्याचा परिणाम शहरवासीयांच्या आरोग्यावर देखील होणार आहे.

वास्तविक, पवना नदीचे संवर्धन करण्यासाठी नदी पात्रात थेटपद्धतीने सोडण्यात येणारे सांडपाणी, मैलामिश्रित पाणी आणि रसायनमिश्रीत पाण्यावर प्रक्रिया करण्याची आवश्यकता आहे. महापालिका प्रशासनाकडे रावेत, किवळे, ताथवडे आणि मामुर्डी या ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित आहेत. मात्र, प्रशासनाने यावर कार्यवाही करण्याबाबत कानाडोळा केला

#### पिंपरी-चिंचवडकर माफ करणार नाही...

» राज्यात सत्तेत असलेले खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, आमदार अश्विनी जगताप आणि आमदार उमा खापरे यांनी शहरातील नागरिकांच्या आरोग्याबाबत गांभीर्याने विचार करणे अपेक्षीत आहेत. उच्च विद्याविभूषित सनदी अधिकारी आयुक्त तथा प्रशासक सध्या शहराचे पालक आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आहेत. मात्र, या पैकी एकाही नेत्याला किंवा आयुक्तांना पवना प्रदूषणाबाबत विचार करायला वेळ नाही. शहराचे आरोग्य धोक्यात घालणाऱ्या या नेते आणि अधिकाऱ्यांनी नदी प्रदूषणाबाबत कायमस्वरुपी उपाययोजना करणे अपेक्षीत आहे. अन्यथा पिंपरी-चिंचवडकर तुम्हाला कदापि माफ करणार नाहीत, याचे जाणीव ठेवली पाहिजे.

---

## भोसरीतील 66 वर्षीय सायकलस्वाराचे प्रेरणादायी "महाराष्ट्र दर्शन"

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्याकडून उपक्रमाचे कौतूक

#### 36 जिल्ह्यांमध्ये 66 दिवसांचा प्रवास, आळंदीत अभियानाचा समारोप

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

**केवळ आपला महाराष्ट्र न म्हणता प्रत्यक्ष महाराष्ट्र पाहून त्याला गवसणी घालण्याचे स्वप्न ६६ वर्षांच्या प्रकाश पाटील यांनी पाहिले. ६६ दिवसांत ३६ जिल्ह्यांचा सायकलवरून प्रवास करण्याचा अनोखे अभियान त्यांनी सुरू केले. हा प्रवास त्यांनी यशस्वी पूर्णही करून दाखविला. नुकतेच आळंदी येथे त्यांच्या या उपक्रमाचा समारोप झाला. या प्रवासादरम्यान आरोग्य, पर्यावरण रक्षण आदी संदेश युवकांमध्ये देखील रुजविण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या या उपक्रमाचे आमदार महेश लांडगे यांनी कौतूक करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.**

महाराष्ट्राला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. संतांचा पदस्पर्श झालेली ही पावन भूमी आहे. तसेच छत्रपती शिवरायांनी घडविलेल्या मावळ्यांचा आणि स्वराज्याचा हा प्रांत आहे. त्यामुळे महाराष्ट्राविषयी अभिमान असल्याचे अनेक जण सांगत असतात. मात्र केवळ अभिमान असून उपयोग नाही. तर हा महाराष्ट्र नेमका कसा आहे, हे प्रत्यक्ष पाहता यावे, यासाठी सायकलवरून भ्रमंती करण्याचे ध्येय प्रकाश पाटील यांनी पाहिले. त्यानुसार महाराष्ट्रातील 36 जिल्हे फिरण्याचे स्वप्न त्यानीं पाहिले. २७ ऑगस्ट २०२३ रोजी भोसरी येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला अभिवादन करून



त्यांनी या भ्रमंतीला सुरूवात केली. कामगार नेते सचिन लांडगे यांच्या उपस्थितीत सायकल अभियानाला सुरुवात झाली होती. त्यानंतर रायगड, नवी मुंबई, जूनी मुंबई, ठाणे, पालघर, नाशीक, नंदूरबार, धुळे, जळगाव आदीसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रवेश केला.प्रत्येक जिल्ह्यात असणाऱ्या तिथल्या वैशिष्ठ स्थळांना भेटी दिल्या. तसेच, शाळा, महाविद्यालय, ग्रामपंचायत या ठिकाणी पर्यावरण व सायकलचे महत्व पटवून दिले. सायकल का चालवावी, या विषयांवर महाराष्ट्र भर संदेश देण्याचे काम पाटील यांनी केले. गड, किल्ले पौराणिक मंदीरे अशा ठिकाणी भेटी देऊन प्रत्येक जिल्हातील सायकल मित्रांच्या भेटी घेतल्या. सायकल विषय एक द्दढ नाते निर्माण करण्यासाठी पाटील यांनी सर्वत्र संदेश दिला. ६६ दिवसात ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण सायकलवरून ५ हजार ७०० किलोमीटरचा प्रवास त्यांनी केला. तर ६१५ किलोमीटरचा पायी प्रवास त्यांनी पूर्ण केला आहे.

#### दत्त गडावर प्रत्येक जिल्ह्याचे नावाने वृक्षारोपण...

**» या प्रवासादरम्यान पाटील यांनी प्रत्येक जिल्ह्यातून माती व पाणी घेऊन आले आहेत. त्या त्या जिल्हाच्या नावाने दिघी येथील दत्त गडावर वृक्षारोपण करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. महाराष्ट्राच्या आराखडा (मॅप) प्रमाणे प्रत्येक शहराच्या नावाने वृक्ष लागवड त्याच जिल्ह्याच्या व्यक्तीच्या हातून करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. त्यामुळे नवीन वृक्ष मित्राची भर पडेल, असे प्रकाश पाटील म्हणाले.**

"सध्याच्या युगात सर्वांनी आरोग्य जपले पाहिजे. विशेषतः तरुणांनी त्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. या बरोबरच पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे ही आपली जबाबदारी आहे. माझ्या सायकलवरून केलेल्या भ्रमंतीवेळी हा संदेश युवकांमध्ये रुजविण्याचे काम मी केले. तसेच केवळ आपला महाराष्ट्र असे न म्हणता प्रत्यक्ष महाराष्ट्राला पाहून घेण्याच्या माझ्या जी जिद्दीने मी सायकलवरून ही भ्रमंती केली.

**- प्रकाश पाटील,** सायकल मित्र, पुणे..

त्यांनी घेतलेला हा निर्णय ध्येयवेड्या माणसाचाच असू शकतो, अशा भावना आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.




# राष्ट्रराज्य हवे की राज्य-राष्ट्र?

**पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी अलीकडेच 'पंजाब-हरियाणातील सतलज-यमुना पाणीतंटय़ा'बद्दलची खुली चर्चा या नावाखाली जो काही प्रकार केला, तो माझ्यासाठी क्लेशदायकच होता. या सार्वजनिक चर्चेत सार्वजनिक हिताचा विचार दूरान्वयानेही नव्हता हे कारण तर आहेच,** पण त्याहीपेक्षा क्लेश झाले ते आणखी एका राज्यातला आणखी एक पक्ष त्याच त्या झुंजीत उतरला (ही झुंज पंजाब-हरियाणाची, पण ती बऱ्याचदा कर्नाटक-तमिळनाडू वा अन्य कुठली असते) आणि तिथेच लडबडला.. राज्यांच्या कोत्या झुंजींचे हे असेच प्रकार कुठे ना कुठे वारंवार घडत असताना, 'राष्ट्रवादा'चा जोरदार पुकारा करणारे मध्यवर्ती सरकार मात्र त्यात मध्यस्थीचा कोणताही प्रयत्न करत नाही आणि यातून आपल्या राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान मिळू शकते हेही त्या सरकारच्या गावीच नसते, हे सारे तर क्लेशदायक आहेच. परंतु याच पंजाब-हरियाणाच्या शेतकऱ्यांनी अवघ्या दोन वर्षांपूर्वी जे राष्ट्रव्यापी किसान आंदोलन उभारले आणि तडीस नेले, त्यांनीदेखील शेतकऱ्यांच्या जिव्हाळय़ाच्या-पाणीवापरासारख्या विषयात शेतकऱ्यांची बाजू घेऊन दोन्हीकडल्या शेतकऱ्यांसाठी न्याय्य ठरणारा तोडगा काढणे



भाग पाडू नये, याचा खेद अधिक झाला. नेत्यांना अंतहीन कोर्टकज्जे करण्यातच रस असेल, पण दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांनी तरी वाद मिटवण्यासाठी का एकत्र बसू नये? तसे झालेले नाही, होत नाही, हे अपयश भारतीय राष्ट्रवादाला लागलेल्या ग्रहणाचे लक्षण ठरते. दिवसेंदिवस आपला राष्ट्रवाद तोंडाळ, तोंडदेखला आणि भडक होतो आहे. खेळासाठी आलेल्या पाकिस्तानी क्रिकेटपटूचा अपमान हे त्या राष्ट्रवादाचे जणू आनंदनिधान. राष्ट्र म्हणून एकात्मता साधायची आणि टिकवायची कशी, याबद्दल आत्मपरीक्षण वगैर काही नाहीच. इस्रायल गाझाला कसा चिरडतो आहे यात आपण समाधान मानणार, पण आपल्याच मणिपूरमध्ये काय परिस्थिती आहे हे समजूनही घेणार नाही. आपला राष्ट्रवाद हा असा नव्हता, तो कितीतरी सकारात्मक होता. वसाहतवादाशी आपण लढत असतानासुद्धा आपण गोऱ्यांच्या किंवा ब्रिटिशांच्याही विरुद्ध नव्हतो. पुढेदेखील, शेजाऱ्यांशी सतत स्पर्धा हा आपला स्वभाव नव्हता; म्हणून तर चीनला संयुक्त राष्ट्रांत स्थान मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न केले. त्या सकारात्मक राष्ट्रवादामुळेच जगभरच्या- आफ्रिका, आशिया वा दक्षिण अमेरिका खंडांतल्या- वसाहतवादविरोधी चळवळी आणि संघर्षांशी आपले नाते जुळले. एकसारखेपणातून एकता येते, या युरोपीय/ पाश्चात्त्य कल्पनेला आपल्या बहुतेक सगळय़ाच स्वातंत्र्यवीरांनी विरोध केला आणि राष्ट्रीय एकतेमागे त्याहीपेक्षा सखोल असा एकात्मभाव असतो, या जाणिवेनेच हे नेते कार्यरत राहिले. गुरुदेव टागोर हे तत्कालीन 'राष्ट्रवाद' संकल्पनेपेक्षा जगाच्या एकात्मतेचे पुरस्कर्ते, पण त्यांनी आपल्याला केवळ राष्ट्रगीत नव्हे तर एकात्मतेचे तत्त्वभान दिले. नेहरूंचा 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा केवळ बौद्धिक प्रेरणेने लिहिलेला ग्रंथ नसून सत्त्वशील राजकीय प्रेरणेने भारताच्या एकात्मतेचा घेतलेला तो शोध आहे. गांधीजींचा अस्पृश्यता-निर्मूलनाचा आग्रह आणि हिंदीचा त्यांनी केलेला पुरस्कार यांमागेही एकात्मतेची आच आहे. माझ्यासाठी तो दीर्घकालीन अभ्यासाचा विषयही आहे. युआन लिन्झ आणि आल्फ्रेड स्टेफान यांच्यासह २०११ मध्ये 'क्राफ्टिंग स्टेट-नेशन्स' या पुस्तकाचा सहलेखक होतो आणि त्या पुस्तकातही याच प्रश्नाचा – भारतीय वाटचालीचा आणि अवस्थेचा- शोध घेण्यात आला होता. 'स्टेट-नेशन' म्हणजे 'राज्य-राष्ट्र' ही प्रमुख संकल्पना या पुस्तकात होती, ती पाश्चात्त्यांच्या युरोपधार्जिण्या 'राष्ट्र-राज्य' किंवा 'नेशन-स्टेट' संकल्पनेपेक्षा भिन्न आहे. त्या पुस्तकाबद्दल इथे थोडे लिहिणे आवश्यक आहे. 'लोकशाही एकाच राज्यात (एका राज्ययंत्रणेखालील एक देश सामाजिक-सांस्कृतिक विविधता कशी सामावून घेऊ शकते?' हा प्रश्न एकविसाव्या शतकातही राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांना पडतो कारण 'प्रत्येक राज्यामध्ये एकच सांस्कृतिक एकसंध राष्ट्र असले पाहिजे' ही वर्षांनुवर्षे प्रचलित असलेली कल्पना युरोपीय लोकशाही देशांनी फारच दृढ केली.

## संपादकीय »

# अधिकं मरणम्..!

***नुसते महामार्ग उभारून चालत नाही. त्या महामार्गावरून वाहन चालवायचे कसे, याचे शिक्षण द्यावे लागते. नुसते मोबाइल फोन आणि मोफत डेटा देऊन भागत नाही.***

नुसते महामार्ग उभारून चालत नाही. त्या महामार्गावरून वाहन चालवायचे कसे, याचे शिक्षण द्यावे लागते. नुसते मोबाइल फोन आणि मोफत डेटा देऊन भागत नाही. इतरांच्या हक्कांवर बाधा न येता हे नवे खेळणे वापरायचे कसे याचे धडे द्यावे लागतात. नुसती प्रखर दिव्यांची निर्मिती करून भागत नाही. इतरांच्या 'डोळय़ावर येणार नाही' अशा बेताने आपले दिवे पाजळायचे कसे हे दाखवून द्यावे लागते. अशी अनेक उदाहरणे नमूद करता येतील. ही अशी सभ्यतेची, नियमाधारित जगण्याची संस्कृती निर्माण करण्याकडे दुर्लक्ष केले की काय होते याचे जीवघेणे उदाहरण म्हणजे केंद्र सरकारच्याच वाहतूक मंत्रालयाने प्रसृत केलेला ताजा अहवाल. तो देशात गेल्या वर्षभरात झालेल्या अपघातांविषयी आहे. त्याबाबत ऊहापोह करण्याआधी काही मुद्दे लक्षात घेणे आवश्यक. यातील बहुसंख्य अपघात हे टाळता येण्याजोग्या वर्गातले आहेत.

**विश्वचषक क्रिकेट स्पर्धामध्ये धक्कादायक निकाल देणाऱ्या संघांची कमतरता नव्हती. कधी झिम्बाब्वे, कधी केनिया, कधी बांगलादेश, कधी आर्यलड इत्यादी. पण आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद अर्थात आयसीसी, तसेच इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि भारत या तीन बडय़ा मंडळांच्या आत्मकेंद्री आणि नफाकेंद्री धोरणांमुळे कसोटी खेळणाऱ्या क्रिकेटविश्वाच्या पलीकडे क्रिकेट हे तसे वाढलेच नाही.**

# आशादायक वळणावर अफगाण क्रिकेट

केनिया क्रिकेटमधून जवळपास नामशेष झालेला आहे. झिम्बाब्वे आणि आर्यलड हे सातत्याने प्रवाहाच्या काठावरच राहिले, तर बांगलादेशला संधी मिळूनही तिचे आजतागायत सोने होऊ शकलेले नाही. कारण खेळाची देशांतर्गत आवड या एकाच निकषावर कोणत्याही देशात एखाद्या खेळाचा विकास होऊ शकत नाही. यासाठी संघटनात्मक पातळीवर प्रयत्न व्हावे लागतात, निधीची उपलब्धता काही वेळेस निर्णायक ठरते. तसे काही होऊ न शकल्यामुळे आणि एकदंरीतच आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला बंदिस्त क्लबचे स्वरूप आल्यामुळे विश्वचषक स्पर्धामध्ये चांगली कामगिरी केलेले अनेक संघ पुढे दीर्घ वाटचालीत मागे पडले किंवा ढेपाळले. याचा एक प्रतिवाद असा केला जातो, की क्रिकेट पाहणाऱ्या-आस्वादणाऱ्या क्रिकेटप्रेमींची संख्या जगात केवळ फुटबॉलप्रेमींच्या खालोखाल गणली जाते. पण तो प्रतिवाद फसवा ठरतो.



कारण क्रिकेटची लोकप्रियता अमेरिकेसारख्या देशांमध्ये पसरली ती तेथील प्राधान्याने भारतीय आणि इतर दक्षिण आशियाई स्थलांतरितांमुळे. त्यामुळेच क्रिकेट हा आजही मोजक्या देशांमध्ये खेळला जाणाराच खेळ ठरतो हेच सत्य. क्रिकेटमधील दखलपात्र नवथरांमध्ये आता आणखी एक नाव जोडले गेले आहे. तो संघ आहे अफगाणिस्तानचा. भारतात सध्या सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेत अफगाणिस्तानने आतापर्यंत इंग्लंड, पाकिस्तान आणि श्रीलंकेला पराभूत केले आहे. यांतील पहिले विद्यमान विश्वविजेते आहेत, तर बाकीचे दोन माजी विश्वविजेते. एखादा विजय धक्कादायक ठरू शकतो, दुसरा कदाचित दुर्मीळ. तीन विजय केवळ धक्कातंत्रातून मिळू शकत नाहीत आणि तितक्या विजयांकडे केवळ 'धक्कादायक' म्हणून पाहता येत नाही. अफगाणिस्तानच्या या विजयांची दखल घेणे त्यामुळे क्रमप्राप्त ठरते.क्रिकेट खेळणाऱ्या देशांमध्ये अफगाणिस्तानचा संघ एकमेवाद्वितीय ठरतो, कारण हे क्रिकेटपटू आपल्या देशात एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेले नाहीत. याचे कारण पहिल्या तालिबान उठावानंतर काबूलमध्ये कोणतेही सरकार आले, तरी या देशास कधीही स्थैर्य लाभू शकलेले नाही. स्थैर्य नाही, त्यामुळे सुरक्षितता नाही. सुरक्षितता नाही, त्यामुळे गुंतवणूक नाही. तसेच नव्वदच्या दशकात अनेक भागांमध्ये सुरू झालेल्या टोळीयुद्धांमुळे मोठय़ा संख्येने अफगाण नागरिक पाकिस्तानच्या खैबर-पख्तुनवा प्रांतात निर्वासित म्हणून गेले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 441 शेतकऱ्यांना 32 लाखांची भरपाई!

## » सभास्थानामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलनासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे (MANOJ JARANGE) यांच्या अंतरवाली सराटी येथील शेतकऱ्यांच्या मदतीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे धावल्याचं पाहायला मिळालंय. अंतरवाली सराटी येथे 14 ऑक्टोबर रोजी झालेल्या मनोज जरांगे-पाटील यांच्या सभेवेळी) लाखोंची गर्दी जमली होती. यावेळी अनेक शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं होतं. या 441 बाधित शेतकऱ्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून 32 लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे.**

मराठा आरक्षण आंदोलन निर्णायक स्थितीत पोहोचले आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत केलेल्या चर्चेनंतर आणि सरकारकडून मिळालेल्या आश्वासनानंतर मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतले असून सरकारला 2 जानेवारीपर्यंतची मुदत दिली आहे. एखाद्या आपत्तीत झालेल्या नुकसानीनंतर शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात येते. एखाद्या सभेमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देण्याचा प्रघात नाही. मात्र मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून मराठा आरक्षणाचा उभारण्यात आलेला प्रामाणिक लढा आणि त्यात समाजबांधवांनी घेतलेला उत्स्फुर्त सहभाग लक्षात घेत मुख्यमंत्री शिंदे यांनी नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला. यामुळे शेतजमीनीचे सभास्थान म्हणून वापरल्याने झालेल्या नुकसानासाठी संबंधित 441 शेतकऱ्यांना भरपाई देण्यात येत आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या या निर्णयाचे शेतकरी बांधवांकडून स्वागत करण्यात येत आहे. दरम्यान, मराठा आरक्षण आंदोलनावेळी झालेल्या




लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्या आंदोलकांवरील उपचारासाठीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून 25 लाखांहून अधिक रुपयांचे अर्थसहाय्य केले होते.

मराठवाड्यात 1 कोटी 73 लाख कुणबी नोंदींची पडताळणी होत असेल तर काम अवघड नाही. त्यामुळे नोंदी तपासण्यात हयगय होता कामा नये. आजपासून युद्धपातळीवर कामाला सुरूवात करा. एक महिना ड्राईव्ह मोडमध्ये काम करा असे आदेश मुख्यमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. कुणबी नोंदी शोधण्याचे काम मराठवाड्यातील 8 जिल्ह्यात सुरू आहे. त्याची व्याप्ती वाढवून उर्वरीत महाराष्ट्रात हे काम सुरू करण्यात येणार आहे. शिंदे कमिटीची कार्यक्रक्षा वाढविणार. त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ वाढविणार. दर आठवड्याला प्रोग्रेस रिपोर्ट घेणार. मागासवर्ग आयोगाच्या कामाला गती देणार. टीआयएसएस, गोखले इन्स्टिट्यूट आणि आणखी एका संस्थेची मदत घेणार . अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळांची व्याप्ती वाढविण्यावर चर्चा. जरांगे यांच्या अन्य मागण्या कशा पद्धतीने पूर्ण करता येतील याबाबत चर्चा. मराठा समाजाला आरक्षण मिळावं याकरता सरकार पातळीवर प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयात मराठा समाजाला मागस सिद्ध करण्याकरता इम्पिरिकल डेटा गोळा करण्याचं काम चालू असून राज्यपातळीवर कुणबीच्या नोंदीही तपासल्या जात आहेत. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (३ नोव्हेंबर) जिल्ह्याधिकाऱ्यांसह बैठक घेतली. यावेळी त्यांनी मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठीही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी विभागाने भाडेतत्वावर जागा घेऊन तातडीने वसतीगृहे सुरू करण्याचे निर्देश देऊन त्याबाबतचा दर आठवड्याला अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिले. "महानगर असलेल्या मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक या जिल्ह्याच्या ठिकाणी प्रति वर्ष प्रति विद्यार्थी ६० हजार रुपये निर्वाह भत्ता, विभागीय ठिकाण, विभागीय मुख्यालय व 'क' वर्ग महापालिका असलेल्या जिल्ह्यांमध्ये प्रति वर्ष ५१ हजार रुपये निर्वाहभत्ता देण्यात येणार असून अन्य जिल्ह्यांच्या ठिकाणी ४३ हजार रुपये निर्वाहभत्ता तर तालुक्याच्या ठिकाणी ३८ हजार रुपये निर्वाह भत्ता देण्यात येणार आहे", अशीही माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

### विद्यार्थ्यांसाठी सरकारचा मोठा निर्णय

» "मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात राज्य शासन गांभीर्याने कार्यवाही करीत आहे. त्यासाठी आता मराठवाड्यासह राज्यातील उर्वरित जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतःहून कुणबी नोंदी तपासण्यासाठी युद्धपातळीवर मोहिम हाती घ्यावी. त्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी आणि त्यांच्या नियंत्रणाखाली कर्मचाऱ्यांची उपलब्धता करून द्यावी. त्यांना आवश्यक ते मनुष्यबळ, साधनसामुग्री देखील तातडीने देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. मंत्रालयस्तरावर अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव विकास खारगे, विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त आणि जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी याबाबत संनियंत्रण करतील", असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# अमोल कोल्हे अजित पवार गटात?

## » खासदार सुनील तटकरे गौप्यस्फोट

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन गट झाले आहेत. जुलै महिन्यात पक्षात उभी फूट पडली. अजित पवारांसह काही आमदार आणि खासदारांनी महायुतीच्या सरकारला पाठिंबा दिला. त्यापाठोपाठ अजित पवारांचा गट सत्तेत सामील झाला आहे. तर शरद पवारांचा गट विरोधी बाकावर आहे. पक्ष फूटल्यानंतर बंडखोर आमदारांना अपात्र करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने विधानसभा अध्यक्षांकडे याचिका दाखल केली आहे.**

तसेच, खासदार सुनील तटकरे



यांना अपात्र करण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे चार महिन्यांपूर्वी याचिका दाखल केली होती. परंतु, याप्रकरणी कुठलीही कारवाई न झाल्यामुळे सुप्रिया सुळे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. दुसऱ्या बाजूला सुप्रिया सुळेंच्या तक्रारीला अजित पवार गटानेही उत्तर दिलं आहे. अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे म्हणाले, अजित पवार गटाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षविरोधात गेल्यामुळे खासदार सुप्रिया सुळे, खासदार श्रीनिवास पाटील आणि खासदार मोहम्मद फैजल यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे. शरद पवार गटात एकूण चार खासदार आहेत. त्यापैकी तीन खासदारांविरोधात सुनील तटकरे यांनी तक्रार केली आहे. परंतु, खासदार अमोल कोल्हे यांच्याविरोधात तटकरे यांनी तक्रार केलेली नाही. त्यामुळे वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या आहेत. यावर स्वतः सुनील तटकरे यांनी उत्तर दिलं आहे. सुनील तटकरे म्हणाले, आम्हाला पहिल्या दिवशीच अमोल कोल्हे यांचं समर्थन होतं. आम्ही राजभवनावर शपथ घेतली त्या दिवशी तिथे अमोल कोल्हे उपस्थित होते. सुप्रिया सुळे यांनी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहिलं आहे. यामध्ये सुळे यांनी म्हटलं आहे, दहाव्या परिशिष्टानुसार सुनील तटकरे यांना अपात्र करण्यासाठी ४ जुलै रोजी आम्ही याचिका दाखल केली होती. परंतु, चार महिन्यांपासून अद्याप याप्रकरणी कुठलीही कारवाई केलेली नाही.

# महाडमध्ये आगीत सात जखमी; ११ बेपत्ता

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

महाड औद्योगिक वसाहतीतील 'ब्ल्यू जेट हेल्थकेअर' कंपनीत शुक्रवारी सकाळी स्फोट होऊन भीषण आग लागली. त्यात सात कामगार जखमी झाले असून, ११ जण बेपत्ता आहेत. कंपनीच्या पावडर प्लान्टमध्ये सकाळी ११ च्या सुमारास पहिला स्फोट झाला. स्फोटानंतर आगीचे लोळ उठले. अग्निशमन दलाच्या जवानांनी सहा गाडय़ांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. वायुगळती, रसायनमिश्रित द्रव्यांच्या लहान-मोठय़ा स्फोटांमुळे बचावकार्यात अडथळे येत होते. दुर्घटनेवेळी कंपनीत ५७ कामगार होते. स्फोटाच्या आवाजाने त्यातील काही जण बाहेर पडले. मात्र, कंपनीच्या आतील भागात काम करणारे कामगार अडकून पडले. शर्थीचे प्रयत्न करून बचावपथकांनी सात जणांना बाहेर काढले. त्यांना महाड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

त्यातील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. ११ कामगार बेपत्ता असून, ते आतमध्येच अडकल्याची भीती आहे. साडेपाच तासांच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात बचाव पथकांना यश आले. जवळपास १५ छोटो-मोठे स्फोट झाले असून, बचावकार्य सुरू आहे. कंपनीकडून मिळालेल्या माहितीनुसार ११ जण बेपत्ता असल्याचे रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

# महिला आरक्षण लागू करणे कठीण!

## आधी लोकसभा-विधानसभेत जागा राखीव होतील

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महिला आरक्षण कायदा (नारी शक्ती वंदन कायदा) तत्काळ लागू करण्याचे आदेश केंद्राला देणे अवघड असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी (3 नोव्हेंबर) सांगितले. काँग्रेस नेत्या जया ठाकूर यांनी 2024 च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी महिला आरक्षण लागू करण्याची मागणी केली होती. जया ठाकूर यांनी आपल्या याचिकेत महिला आरक्षण कायद्यातून तो भाग काढून टाकण्याची मागणी केली होती, ज्यामध्ये जनगणनेनंतर त्याची अंमलबजावणी केली जाईल, असे म्हटले आहे. काँग्रेस नेते म्हणाले की, मागासवर्गीयांना आरक्षण देण्यासाठी जनगणनेची गरज आहे. महिला आरक्षणाची गरज काय?**

यावर न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भाटी म्हणाले – जनगणनेशिवाय इतरही अनेक काम आहेत. सर्वप्रथम लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी जागा राखीव ठेवल्या जातील. याप्रकरणी केंद्राला नोटीस पाठवण्यासही खंडपीठाने नकार दिला. आरक्षणाचे कौतुक करताना सुप्रीम कोर्ट म्हणाले- महिला आरक्षणाचा निर्णय हा एक चांगले पाऊल आहे. आता या प्रकरणावर 22 नोव्हेंबरला इतर याचिकांसह सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

महिला आरक्षण कायद्यांतर्गत लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी 33% आरक्षण लागू केले जाईल. सध्या लोकसभेत 82 महिला खासदार आहेत, नारी शक्ती वंदन कायद्यांतर्गत लोकसभेतील महिला खासदारांची संख्या 181 होणार आहे. हे आरक्षण 15 वर्षे टिकेल. यानंतर संसदेची इच्छा असल्यास ती मुदत वाढवू शकते. हे आरक्षण थेट निवडून आलेल्या



लोकप्रतिनिधींना लागू असेल. म्हणजेच ते राज्यसभा आणि राज्यांच्या विधानपरिषदांना लागू होणार नाही. नवीन संसदेच्या कामकाजाच्या पहिल्या दिवशी 19 सप्टेंबर रोजी महिला आरक्षण विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. त्यानंतर हे विधेयक 20 सप्टेंबरला लोकसभेने आणि 21 सप्टेंबरला राज्यसभेने मंजूर केले. 29 सप्टेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा बनला. आता हे विधेयक विधानसभेत पाठवले जाणार आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी, देशातील 50% विधानसभेत ते पारित करणे आवश्यक आहे. सीमांकनानंतरच महिला आरक्षण कायदा लागू होईल. परिसीमन जनगणनेवर आधारित असेल. 2024 च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी जनगणना आणि परिसीमन करणे जवळजवळ अशक्य आहे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुका वेळेवर झाल्या तर यावेळी महिला आरक्षण लागू होणार नाही. 2029 च्या लोकसभा निवडणुका किंवा काही पूर्वीच्या विधानसभा निवडणुकांपासून हे लागू होऊ शकते. संसदेत महिला आरक्षणाचा प्रस्ताव जवळपास 3 दशकांपासून प्रलंबित आहे. हा मुद्दा सर्वप्रथम 1974 मध्ये महिलांच्या स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी समितीने उपस्थित केला होता. 2010 मध्ये, मनमोहन सरकारने राज्यसभेत महिलांसाठी 33% आरक्षणाचे विधेयक बहुमताने मंजूर केले होते. तेव्हा सपा आणि आरजेडीने या विधेयकाला विरोध केला आणि तत्कालीन यूपीए सरकारचा पाठिंबा काढून घेण्याची धमकी दिली. त्यानंतर हे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले नाही. तेव्हापासून महिला आरक्षण विधेयक प्रलंबित होते.

### राष्ट्रपतींच्या मंजुरीनंतर आरक्षण विधेयक

» महिला आरक्षण कायद्यांतर्गत लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी 33% आरक्षण लागू केले जाईल. सध्या लोकसभेत 82 महिला खासदार आहेत, नारी शक्ती वंदन कायद्यांतर्गत लोकसभेतील महिला खासदारांची संख्या 181 होणार आहे. हे आरक्षण 15 वर्षे टिकेल. यानंतर संसदेची इच्छा असल्यास ती मुदत वाढवू शकते. हे आरक्षण थेट निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना लागू असेल. म्हणजेच ते राज्यसभा आणि राज्यांच्या विधानपरिषदांना लागू होणार नाही. नवीन संसदेच्या कामकाजाच्या पहिल्या दिवशी 19 सप्टेंबर रोजी महिला आरक्षण विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. त्यानंतर हे विधेयक 20 सप्टेंबरला लोकसभेने आणि 21 सप्टेंबरला राज्यसभेने मंजूर केले. 29 सप्टेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा बनला. आता हे विधेयक विधानसभेत पाठवले जाणार आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी, देशातील 50% विधानसभेत ते पारित करणे आवश्यक आहे.

# मोदींच्या हस्ते फूड इंडियाचे उद्घाटन!

## अन्न प्रक्रिया उद्योगाचे नेतृत्व करण्याची क्षमता

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (3 नोव्हेंबर) नवी दिल्लीच्या प्रगती मैदानातील भारत मंडपम येथे वर्ल्ड फूड इंडिया 2023 च्या दुसऱ्या आवृत्तीचे उद्घाटन केले. या कार्यक्रमात 80 हून अधिक देशांतील 1200 हून अधिक लोक सहभागी झाले आहेत. पीएम मोदी आपल्या भाषणात म्हणाले - भारताचे अन्न प्रक्रिया क्षेत्र वेगाने नवीन उद्योग म्हणून उदयास आले आहे. गेल्या 9 वर्षांत या क्षेत्रात 50 हजार कोटी रुपयांची विदेशी गुंतवणूक आली आहे. देशातील महिलांमध्ये या उद्योगाचे नेतृत्व करण्याची क्षमता आहे.**

कृषी निर्यातीत प्रक्रिया केलेल्या अन्नाचा वाटा 13 वरून 23 टक्क्यांवर पोहोचला आहे. 9 वर्षात प्रक्रिया केलेल्या अन्नाच्या निर्यातीत 150% वाढ झाली आहे. कृषी निर्यातीत आपण जागतिक स्तरावर सातव्या क्रमांकावर आलो आहोत. अन्न प्रक्रिया उद्योगाशी संबंधित असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यामध्ये भारताने प्रगती केली नाही. अन्न क्षेत्राशी संबंधित प्रत्येक कंपनीसाठी ही सर्वोत्तम स्टार्टअप संधी आहे. वर्ल्ड फूड इंडिया कार्यक्रमात पंतप्रधानांनी फूड स्ट्रीटचे उद्घाटनही केले. केंद्रीय अन्न मंत्री पशुपती कुमार पारस यांनी परदेशी गुंतवणूकदारांना भारतातील अन्न प्रक्रिया क्षेत्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. 3 ते 5 नोव्हेंबर या कालावधीत वर्ल्ड फूड इंडिया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते समारोप होईल. वर्ल्ड फूड इंडियाची पहिली आवृत्ती 2017 मध्ये आयोजित करण्यात आली होती. त्यात 918 किलो खिचडी तयार करण्यात आली. या काळात सर्वाधिक खिचडी बनवण्याचा विश्वविक्रम झाला. या कार्यक्रमाचा उद्देश भारताला जगाची फूड बास्केट म्हणून दाखवण्याचा आहे. 23 राज्य सरकारे, 18 केंद्रीय मंत्रालये आणि संबंधित विभाग यात सहभागी होत आहेत.



### सर्वात लांब डोसा बनवण्याचा प्रयत्न

» या कार्यक्रमात यावर्षी जगातील सर्वात लांब डोसा बनवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. केंद्रीय मंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी 1 नोव्हेंबर रोजी ही माहिती दिली होती. त्यांनी सांगितले होते की, या वर्षी सर्वात लांब डोसा, ज्याची लांबी 100 फुटांपेक्षा जास्त असेल, त्याचा गिनीज रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न केला जाईल. हा बाजरीचा डोसा बनवण्यासाठी 60 ते 80 शेफ एकत्र काम करतील.

# विवाहित महिलेला वर्षाला 12 हजार!

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

छत्तीसगड विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. तीन महिन्यांत तो तयार केल्याचे जाहीरनामा समितीचे निमंत्रक विजय बघेल बोल यांनी सांगितले. 3 ऑगस्ट ते 3 नोव्हेंबर दरम्यान तयार करण्यात आला आहे. त्यात 35 सदस्य होते. समाजातील सर्व घटकांकडून मते घेण्यात आली आहेत. 2 लाखांहून अधिक सूचना आल्या. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीरनामा म्हणजेच संकल्प पत्र जारी केले. अमित शहा म्हणाले की, भाजपचा जाहीरनामा हा संकल्प पत्र आहे. आपण हे राज्य स्थापन केले होते.हा भाग विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हायला हवा होता. भाजपचे सरकार स्थापन होऊन पंधरा वर्षे झाली. बिमारू राज्यापेक्षा चांगले राज्य केले. येत्या पाच वर्षात छत्तीसगडचा पूर्ण विकास करू. केंद्रीय गृहमंत्री म्हणाले की, छत्तीसगडमध्ये भाजपचे सरकार असताना आम्ही छत्तीसगडमधून नक्षलवाद संपवला होता. छत्तीसगडचे सरकार जातीवाद आणि तुष्टीकरण करत असल्याचा आरोप त्यांनी केला. भूपेश बघेल हे छत्तीसगडच्या विकासातील सर्वात मोठा अडथळा आहे. ते म्हणाले, "मी येथे अनेक ओबीसी नेत्यांना भेटलो आणि त्यांनी मला सांगितले की छत्तीसगडमध्ये सरकार बदलणार आहे. आमच्या सरकारने छत्तीसगडमध्ये वेगाने विकास केला आहे." प्रत्येक विवाहित महिलेला दरवर्षी 12 हजार रुपये दिले जातील

18 लाख पीएम गृहनिर्माण योजनेची घरे तेंदूपत्ता 5500 रुपये प्रति मानक बॅगने खरेदी.



# महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम वनिताचं फिल्मी करिअर

मराठी मनोरंजनसृष्टी पुन्हा बहरली आहे. वेगवेगळ्या दर्जाची नाटके (DRAMA), मालिका (SERIAL) आणि चित्रपट (MOVIES) प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. जगभरातील प्रेक्षकांना मराठी कलाकृती आवडत आहेत. पण कलाकाराचं वैयक्तिक आयुष्य कसं आहे, मालिका आणि सिने विश्वात काय घडामोडी घडत आहेत हे जाणून घेण्याची देखील प्रेक्षकांना उत्सुकता आहे. अभिनेत्री वनिता खरात (VANITA KHARAT) नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. कॉलेजमध्ये असताना रंगभूमीवर ठेवलेलं पहिलं पाऊल ते 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' (MAHARASHTRACHI HASYAJATRA) पर्यंतचा वनिताचा प्रवास खूपच फिल्मी आहे. न्यूड फोटोशूट (NUDE PHOTOSHOOT) ते 'कबीर सिंह' (KABIR SINGH) सिनेमातील मोलकरीण पुष्पा अशा अनेक कारणांनी वनिता (MARATHI ACTRESS) चर्चेत आली आहे. धकधक गर्ल माधुरी दीक्षितचा (MADHURI DIXIT) आजही मोठा चाहतावर्ग आहे. सौंदर्य आणि अभिनयाच्या जोरावर माधुरीने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'बकेटलिस्ट' या सिनेमानंतर माधुरी पुन्हा एकदा मराठी मनोरंजनसृष्टी गाजवण्यासाठी सज्ज आहे. माधुरीने तिच्या 'पंचक' (PANCHAK) या सिनेमाची घोषणा केल्यापासून प्रेक्षक या सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत. 'ठरलं तर मग' (THARALA TAR MAG) ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका आहे. या मालिकेतील नवनवे ट्विस्ट चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहे. गेल्या काही दिवसांपासून सायली खोटी प्रेग्नंट असल्याचा ट्रॅक मालिकेत सुरू आहे. पण आता मालिकेच्या आगामी भागात सायली स्वत: ती प्रेग्नंट नसल्याचं सत्य सर्वांना सांगणार आहे.

# 'मन्नत'बाहेर चाहत्यांची गर्दी !

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानचा नुकताच 58 वा वाढदिवस साजरा झाला आहे. वाढदिवशी शाहरुखला शुभेच्छा देण्यासाठी आणि त्याची एक झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी 'मन्नत'बाहेर (MANNAT) तुफान गर्दी केली होती. या गर्दीत चाहत्यांचे 34 मोबाईल फोन चोरीला गेले आहेत. एनडीटीव्हीच्या रिपोर्टनुसार, शाहरुखच्या चाहत्यांचे गर्दीत 34 मोबाईल फोन चोरीला गेले आहेत.'मन्नत' बाहेर मोबाईल चोरी झाल्यानंतर चाहत्यांनी मुंबईतील वांद्रे पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे. शाहरुखच्या वाढदिवशी हजारो चाहत्यांनी 'मन्नत'बाहेर मोठी गर्दी केली होती. मुंबईसह पुणे, कोल्हापूर, सांगली, नांदेड या ठिकाणांहून आलोक कुमार, अरबाज वाहिद खान, विनय वानखेडे, गुलाम कामरा, ध्रुव कोठारी, आयुष गाला, सुशील मोहिते, मंजीत तुफारकंती, संजय हलदर, अब्बास झागा, समीर इमाम, राज वोहरा, अल्काश ताडे, दिल सिंह, प्रिया राय आदि लोकांचे मोबाईल चोरीला गेले आहेत.

# उर्फी जावेदला अटक?



तिच्या अभिनयापेक्षा अतरंगी फॅशनमुळे जास्त चर्चेत असते. पण आता उर्फी जावेदला अटक झाल्याचं म्हटलं जात आहे. उर्फीला तोकडे कपडे घालणं महागात पडलं आहे. तोकडे कपडे घातल्याने पोलिसांनी उर्फीला ताब्यात घेतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. उर्फीला पोलिसांनी ताब्यात घेतल्याने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. उर्फी जावेदचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये उर्फी सकाळी-सकाळी एका कॉफी शॉपमध्ये बसलेली दिसत आहे. दरम्यान पोलीस अधिकारी तिला ताब्यात घेतात. उर्फीला त्यांच्यासोबत पोलीस ठाण्यात घेऊन जातात. त्यावेळी उर्फी त्यांना त्यामागचं कारण विचारते. त्यावर त्या पोलीस अधिकारी म्हणतात,"एवढे छोटे-छोटे कपडे परिधान करून कोण फिरतं?". उर्फीच्या व्हायरल व्हिडीओमध्ये तिने लाल रंगाचा बॅकलेस टॉप आणि जीन्स परिधान केलेली दिसत आहे. उर्फीच्या या व्हिडीओवर चाहत्यांचा संमिश्र प्रतिसाद मिळत आहे. काहींनी हा प्रँक असून ती मस्करी करतेय असं म्हटलं आहे. तर तिचे चाहते मात्र चिंता व्यक्त करत आहेत. उर्फी जावेदचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर चाहते हैराण झाले आहेत. उर्फी जावेदला दोन दिवसांपूर्वी जीवे मारण्याची धमकी मिळाली होती. उर्फीने 'भूल भुलैया' सिनेमातील राजपाल यादवसारख्या पंडिताचा गेटअप करत एक व्हिडीओ शेअर केला. तिचा हा व्हिडीओ व्हायरल झाला. दरम्यान एका अज्ञात व्यक्तीने उर्फी जावेदला ईमेलच्या माध्यमातून धमकी दिली. व्हिडीओ डिलीट करण्यास सांगितले आणि तसे न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर उर्फीने ट्वीट करत चाहत्यांना यासंदर्भात माहिती दिली होती. आपल्या हटके फॅशन स्टाईलमुळे उर्फी जावेद कायम चर्चेत असते. सोशल मीडियावर तिचे वेगवेगळ्या लुकमधील फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत असतात. छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्रींच्या यादीत उर्फीचा समावेश आहे. 'मेरी दुर्गा' आणि 'ये रिश्ता क्या कहलाता है' या मालिकांमध्ये उर्फीने काम केलं आहे.

# 'नाळ 2' चा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला!

मराठी चित्रपट क्षेत्रातील प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळेच्या नाळ या चित्रपटानं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले होते. त्याला प्रेक्षकांचा मिळालेला प्रतिसादही मोठा होता. गेल्या काही दिवसांपासून त्याच्या दुसऱ्या भागाची चाहत्यांना, प्रेक्षकांना उत्सुकता होती. आता त्याचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. २०१८मध्ये प्रदर्शित झालेल्या सुधाकर रेड्डी यंकट्टी दिग्दर्शित 'नाळ' या चित्रपटाने अभूतपूर्व यश प्राप्त केले. राष्ट्रीय पुरस्कारावर नाव कोरले. त्या इवल्याशा गोड 'चैतू'ने प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. मात्र ही कथा एका अशा वळणावर येऊन थांबली, जिथे अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. तेव्हा न उलगडलेल्या या प्रश्नांची उत्तरे आता 'नाळ भाग २'मध्ये मिळणार आहेत. झी स्टुडिओज आणि नागराज पोपटराव मंजुळे निर्मित 'नाळ भाग २' दिवाळीत म्हणजेच १० नोव्हेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होत असून नुकतेच या चित्रपटाचे ट्रेलर सोशल मीडियावर झळकले आहे. या चित्रपटात श्रीनिवास पोकळे, नागराज मंजुळे, देविका दफ्तरदार, दिप्ती देवी, त्रिशा ठोसर आणि जितेंद्र जोशी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'नाळ'मध्ये खऱ्या आईकडे निघालेला चैतू, त्याच्या खऱ्या आईकडे पोहोचणार का? त्यांच्यातील अबोला दूर होणार का, याचे उत्तर आपल्याला 'नाळ भाग २'मध्ये मिळणार आहे. 'नाळ भाग २'चे ट्रेलरही उत्कंठा वाढवणारे आहे. ट्रेलर पाहाता हा चित्रपट पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात यशस्वी होणार असल्याचे दिसतेय. नागराज मंजुळे यांच्या चित्रपटात चित्रीकरण स्थळही एक व्यक्तिरेखा साकारत असते. याचा प्रत्यय 'नाळ भाग २'मध्येही येत आहे.

# धकधक गर्ल माधुरी 'पंचक' मराठी सिनेमात



धकधक गर्ल माधुरी दीक्षितचा (MADHURI DIXIT) आजही मोठा चाहतावर्ग आहे. सौंदर्य आणि अभिनयाच्या जोरावर माधुरीने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'बकेटलिस्ट' या सिनेमानंतर माधुरी पुन्हा एकदा मराठी मनोरंजनसृष्टी गाजवण्यासाठी सज्ज आहे. माधुरीने तिच्या 'पंचक' (PANCHAK) या सिनेमाची घोषणा केल्यापासून प्रेक्षक या सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत. माधुरी दीक्षितच्या 'पंचक' या सिनेमात अभिनेता आदिनाथ कोठारे (ADINATH KOTHARE) आणि तेजश्री प्रधान (TEJASHREE PRADHAN) मुख्य भूमिकेत असणार आहेत. तसेच आनंद इंगळे, नंदिता पाटकर, विद्याधर जोशी, भारती आचरेकर, सतीश आळेकर, सागर तळाशीकर, दिलीप प्रभावळकर, दीप्ती देवी, संपदा जोगळेकर, आशिष कुलकर्णी हे कलाकार या सिनेमात महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. एकंदरीतच या सिनेमात प्रेक्षकांना दमदार कलाकारांचा दर्जेदार अभिनय पाहायला मिळणार आहे. माधुरीने दसऱ्याच्या मुहूर्तावर 'पंचक' या आगामी मराठी सिनेमाची घोषणा केली. माधुरी दीक्षित आणि तिचे पती श्रीराम नेने हे या सिनेमाची निर्मिती करत आहेत. माधुरीने या सिनेमाची घोषणा करत लिहिलं होतं,"दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर आम्ही 'पंचक' या मराठी सिनेमाची निर्मिती करत आहोत. जयंत जठार आणि राहुल आवटे हा सिनेमा दिग्दर्शित करत असून आमची ही दुसरी निर्मिती आहे. एका अविस्मरणीय सिनेमॅटिक अनुभवासाठी सज्ज व्हा. 5 जानेवारी 2024 रोजी सिनेमा होणार प्रदर्शित". माधुरी दीक्षितचा आगामी 'पंचक' हा सिनेमा 5 जानेवारी 2024 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. जयंत जठार आणि राहुल आवटे या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळणार आहे. तसेच माधुरी दीक्षित नेने आणि डॉ. श्रीराम नेने या सिनेमाची निर्मिती करत आहे. या सिनेमाची घोषणा झाल्यापासून प्रेक्षक या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# अफगाणिस्तान पाचव्या स्थानी!

## » अफगाणिस्तानने विश्वचषकात चौथा विजय नोंदवला

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**अफगाणिस्तानने वर्ल्ड कप 2023 मध्ये सलग तिसरा विजय मिळवला आहे. या संघाने शुक्रवारी (दि.3) नेदरलँड्सचा 7 गडी राखून पराभव केला. लखनौच्या एकना स्टेडियमवर नाणेफेक जिंकून फलंदाजीला आलेल्या नेदरलँडचा संघ 46.3 षटकांत 179 धावांवर सर्वबाद झाला. अफगाणिस्तानच्या फलंदाजांनी 31.3 षटकांत 180 धावांचे लक्ष्य 3 गडी गमावून गाठले. एकूण चार विजयासह आता अफगाण संघाने गुणतालिकेत पाकिस्तानला मागे टाकून पाचवे स्थान पटकावले आहे.**




नेदरलॅंडने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा कर्णधार हशमतुल्लाने सर्वाधिक नाबाद 56 धावा केल्या. रहमत शाहने अर्धशतकी (52) धावांची खेळी केली. अजमतुल्ला 31 धावा करून नाबाद राहिला. नेदरलँडसाठी लोगान व्हॅन बीक, व्हॅन डर मर्वे आणि साकिब झुल्फिकार यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तत्पूर्वी, अफगाणिस्तानविरूद्धच्या सामन्यात नेदरलँड्सने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना नेदरलॅन्डचा डाव 179 धावांवर संपुष्टात आला. फलंदाजीमध्ये नेदरलॅन्डकडून एंजेलब्रेक्टने सर्वाधिक 58 धावांची खेळी केली. त्यासह मॅक्स 42 आणि कोलिन एकरमनने 29 धावांची खेळी केली. यांच्या व्यतिरिक्त एकाही फलंदाजाला मैदानावर फारकाळ टिकता आले नाही. नेदरलॅन्डचे चार फलंदाज धावबाद झाले. तर अफगाणिस्तानकडून मोहम्मद नबीने सर्वाधिक 3 विकेट घेतल्या. नबीसह नूर अहमदने 2 तर मुजीब अल रहमानने 1 विकेट घेतली. या विजयासह अफगाणिस्तान उपांत्य फेरीच्या शर्यतीत कायम आहे. 7 सामन्यांत चौथ्या विजयासह संघ गुणतालिकेत 5व्या स्थानावर पोहोचला आहे. अफगाणिस्तानचे 8 गुण आहेत. मागील 2 सामन्यात संघाने श्रीलंकेचा 7 गडी राखून तर पाकिस्तानचा 8 गडी राखून पराभव केला होता. अफगाणिस्तानने नेदरलँड्सचा पराभव करून चौथा विजय नोंदवला. अफगाणिस्तानने नेदरलॅंडने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करत सामना जिंकून उपांत्य फेरीच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले. अफगाणिस्तान संघाची एक खासियत या स्पर्धेत दिसते, ती विराट कोहलीसारखीच आहे. अफगाणिस्तान क्रिकेट संघाने या विश्वचषकात सलग तिसऱ्यांदा धावांचा पाठलाग करून सामना जिंकला आहे. जो विराट कोहलीने आपल्या कारकिर्दीत अनेकदा केला आहे. याच कारणामुळे विराट कोहलीला चेस मास्टर देखील म्हटले जाते. अफगाणिस्तानचा क्रिकेट संघही या विश्वचषकात अशीच कामगिरी करत आहे. या विश्वचषकात अफगाणिस्तानने आधी इंग्लंड, नंतर पाकिस्तान, श्रीलंका आणि आता नेदरलँड्सचा पराभव केला. आता अफगाणिस्तानला ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन सामने खेळायचे आहेत. हे दोन्ही सामने अफगाणिस्तानने जिंकल्यास ते उपांत्य फेरीत सहज पोहोचेल. मात्र, आजच्या सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, प्रथम फलंदाजी करणाऱ्या नेदरलँड्स संघ केवळ 179 धावांवरच मर्यादित राहिला. या सोप्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या नेदरलँड संघाने अवघ्या 31.3 षटकांत 181 धावा केल्या आणि सामना सात विकेट राखून जिंकला. या विश्वचषकात लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा हा सलग तिसरा विजय आहे. या विश्वचषकात अफगाणिस्तान संघाने प्रथम धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा पराभव केला.

### विराटचा फॉर्म्युला स्वीकारला

» श्रीलंकेविरुद्धच्या विजयानंतर अफगाणिस्तानच्या प्रशिक्षकांनी त्यांचा संघ पाठलाग करताना छोटे लक्ष्य कसे बनवतो, हे सांगितले होते. धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानची ही रणनीती विराट कोहलीच्या रणनीतीशी मिळतेजुळते आहे. विराटने आपल्या कारकिर्दीत अनेकवेळा असे केले असले तरी या विश्वचषकातही विराटने अनेकवेळा असा पाठलाग करून संघाला विजय मिळवून दिला आहे. विराटसह केएल राहुलने ऑस्ट्रेलियाविरुद्ध 85 धावांची खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

# आयपीएल 2024 चा लिलाव दुबईत!

## » लिलावापूर्वी मुंबई इंडियन्सची मोठी खेळी!

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. आयपीएलच्या 17 व्या हंगामाचा लिलाव पुढील महिन्यात म्हणजेच 19 डिसेंबर रोजी दुबईत होणार आहे. आयपीएलच्या इतिहासात भारताबाहेर लिलाव होण्याची ही पहिलीच वेळ असेल.**



### शेफर्डची आयपीएल कारकीर्द

» रोमारियो शेफर्डने आयपीएलमध्ये आतापर्यंत केवळ 4 सामने खेळले आहेत. आयपीएल 2023 मध्ये तो लखनऊ सुपर जायंट्ससाठी फक्त 1 सामना खेळला होता. या सामन्यात त्याने ना फलंदाजी केली ना गोलंदाजी केली होती. तर 2022 साली झालेल्या आयपीएल हंगामात त्याने सनरायझर्स हैदराबादसाठी 3 सामने खेळले होते. यादरम्यान त्याने 10.89 च्या इकॉनॉमीने धावा देत 3 विकेट्स घेतल्या होत्या.

आयपीएल 2024 च्या लिलावात, प्रत्येक संघाकडे त्यांचा संघ तयार करण्यासाठी 100 कोटी रुपये असतील. जी मागील हंगामातील 95 कोटींच्या तुलनेत 5 कोटींनी वाढली आहे. प्रत्येक संघाला लिलावाच्या दिवशी किती खर्च करावा लागतो ते 2023 च्या लिलावापासून न खर्च केलेल्या व्यतिरिक्त रिलीज केलेल्या खेळाडूंच्या मूल्यावर अवलंबून असते. एका अहवालानुसार, संघांना 26 नोव्हेंबर 2024 पर्यंत जाहीर झालेल्या खेळाडूंची यादी शेअर करावी लागेल. टाटा IPL 2024 साठी सर्व संघ जोरात तयारी करत आहेत. अलीकडेच अनेक संघांनी आपल्या कोचिंग स्टाफमध्ये मोठे बदल केले आहेत. त्याच वेळी, आता ट्रेडिंग विंडो अंतर्गत खेळाडू खरेदी करण्याची प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. यामध्ये मुंबई इंडियन्सने पहिली बाजी खेळत लखनौ सुपर जायंट्सच्या एका खेळाडूचा आपल्या संघात समावेश केला आहे. टाटा IPL 2024 च्या आधी सुरू असलेल्या टाटा इंडियन प्रीमियर लीग ट्रेडिंग विंडो दरम्यान लखनौ सुपर जायंट्स (LSG) कडून रोमॅरियो शेफर्डला मुंबई इंडियन्सने विकत घेतले आहे. रोमारियो शेफर्ड हा आतापर्यंत आयपीएलमध्ये एलएसजी आणि सनरायझर्स हैदराबाद संघाकडून खेळला आहे. मुंबई इंडियन्सने रोमारियो शेफर्डला

# डिव्हिलियर्स सचिनच्या मराठी शाळेत रमतो!

नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

इंडियन इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलमुळे (IPL) जगभरातील क्रिकेटपटूंचे भारत आता एक दुसरं घर होऊन गेलं आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीविषयी ते नेहमीच भारावून गेले आहेत. त्यामुळे या क्रिकेटपटूंचे नेहमीच भारताविषयी व्यक्त होणारे प्रेम आनंद द्विगुणीत करणारा असतो. क्रिकेट जगतामध्ये मिस्टर 360 म्हणून परिचित असलेला दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटर एबी डिव्हिलियर्स आज मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला घडवणाऱ्या मराठी शाळेला भेट दिली. त्याने शारदाश्रम शाळेला (AB DE VILLIERS VISITS SACHIN TENDULKAR SHARADASHRAM MARATHI SCHOOL) भेट देत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मनमोकळेपणाने उत्तरे दिली. यावेळी विद्यार्थ्यांशी सुद्धा संवाद साधला. त्याचबरोबर त्यांना भविष्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी डिव्हिलियर्सने अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. तो म्हणाला की मी आणि विराट कोहली आयपीएलमध्ये एकत्र खेळलो आहे.

त्याची बॅटिंग आणि नेतृत्व मला आवडतं. प्रत्येक मॅचमध्ये तो भावनिकरित्या खूप गुंतलेला असतो. त्यामुळे तो प्रत्येक मॅच आव्हान म्हणूनच खेळत असतो. तो पुढे म्हणाला की, आयुष्यातील प्रत्येक सकाळ नवी संधी आपल्याला देत असते, असं मला नेहमीच वाटतं. हीच एक दिवसाची सुरुवात करण्याची संधी असते. त्याने पुढे नमूद केलं की, मला प्रत्येक बॉलवर हिट मारायला आवडतो. त्याने रशिद खान आणि मोहम्मद शमीची बॉलिंग खेळायला आवडत असल्याचेही सांगितले. तो म्हणाला की, रशीद खानची बॉलिंग खेळण्यासाठी एक आव्हान आहे.